**CNR No. MHWR030059732022**
**नि. फौ. ख. क्र. ८४२/२०२२**
**सरकार / वामन**
**<u>नि.क्र. २९</u>**

| | |
|---|---|
| <u>आरोपीचे नाव</u> | : वामन बालाजी जगताप, |
| वय | : ७० वर्षे, व्यवसाय : मजुरी, |
| रा. | : येसंबा, ता. जि. वर्धा. |

प्रश्न क्रमांक १ : मी आता तुम्हाला जे प्रश्न विचारणार आहे त्यांची उत्तरे देण्याकरिता तुम्ही बांधील नाही. तुम्ही उत्तर देण्याचे नाकारू शकता. त्याकरीता तुम्हाला कोणतीही शिक्षा होणार नाही. परंतु तुम्ही उत्तर दिल्यास तुम्ही दिलेले सदर उत्तर हे तुमच्या विरूध्द वापरले जावू शकते. हे तुम्हाला समजले का ?

उत्तर : होय.

प्रश्न क्रमांक २ : अभियोग पक्षातर्फे न्यायालयात सादर करण्यात आलेला पुरावा तुम्हाला समजला काय ?

उत्तर : होय.

प्रश्न क्रमांक ३ : अभियोगपक्षाचे सा.क्र. २ श्री. पाउलझाडे याच्या साक्षीत असे आले आहे की, दि. २७/०८/२०२० रोजी ते पोलिस स्टेशन सेवाग्राम येथे कार्यरत असतांना त्यांना अपराध क्र. ५१३/२०२२ चा तपास मिळाला होता. याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर : हे खरे नाही.

प्रश्न क्रमांक ४ : त्यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, तपासादरम्यान त्यांनी पंचांना नि.क्र. २० वरील सुचना पत्र दिले आणि त्यानंतर ते पंचांसह येसंबा येथे घटनास्थळावर गेले होते. याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर : हे खरे नाही.

प्रश्न क्रमांक ५ : त्यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, तेथे त्यांनी फिर्यादी व पंचासमक्ष घटनास्थळाची पाहणी करून तेथून एक लाकडी वेळवाची काडी जप्त केली होती. तसेच त्याबाबतचा त्यांनी नि.क्र. २१

वरील घटनास्थळ व जप्ती पंचनामा तयार केला होता.

उत्तर : हे खरे नाही.

प्रश्न क्रमांक ६ : त्यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, दि. २९/०८/२०२२ रोजी जखमींचे सीटी स्कॅन आणि एक्स रे रिपोर्ट मिळण्यारीता नि.क्र. २२ वरील पत्र दिले होते आणि त्यानुसार अहवाल प्राप्त केले होते. याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर : हे खरे नाही.

प्रश्न क्रमांक ७ : त्यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, दि. ०८/०९/२०२२ रोजी जप्त मुद्देमालाची वैद्यकीय अधिका—यांकडून क्युरी करून मिळण्याबाबत नि.क्र. २३ वरील पत्र दिले होते. तसेच त्याचा क्युरी रिपोर्ट प्राप्त केला होता. याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर : हे खरे नाही.

प्रश्न क्रमांक ८ : त्यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, त्यांना तपासाअंती तुमचेविरूध्द सबळ पुरावा मिळून आल्याने न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते. याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर : हे खरे नाही.

प्रश्न क्रमांक ९ : अभियोगपक्षाची सा.क्र. ३ सुषमा हिच्या साक्षीत असे आले आहे की, फिर्यादी तिचे पती असून ते दि. २४/०७/२०२३ रोजी मरण पावले आहेत. याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर : हे खरे नाही.

प्रश्न क्रमांक १० : तिच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, दि. २७/१०/२०२२ रोजी सकाळी ८ वाजताचे सुमारास फिर्यादी तिला *'तु बाबांचे घरी हिस्सा मागण्यास जाते'* असे सांगत होता. याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर : हे खरे नाही.

प्रश्न क्रमांक ११ : तिच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, फिर्यादी तिचे आधीच आरोपीचे घरी गेला होता. तेथे तिने पाहिले की तुम्ही व प्रविण जगताप असे मिळून तिचे पतीला काडीने मारहाण करीत

होते. याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर : हे खरे नाही.

प्रश्न क्रमांक १२ : तिच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, त्यामध्ये तिचे पतीचे डोके फुटून ते खाली पडलेले होते. तेव्हा तिने तिचे पतीला पाणी पाजले. याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर : हे खरे नाही.

प्रश्न क्रमांक १३ : तिच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, तुम्ही तिला 'तु येथे कश्याला आली' असे म्हणून तिला शिवीगाळ करत होते. याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर : हे खरे नाही.

प्रश्न क्रमांक १४ : तिच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, त्यावेळी प्रविण जगतापने तिचे उजव्या हाताचे अंगठयाला चावा घेतल्यामुळे तिचे हाताला १ ते ९ टाके लागले होते. याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर : हे खरे नाही.

प्रश्न क्रमांक १५ : तिच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, आरोपी वामनने तिला काडीने पायावर, खांद्याला, पाठीला व हाताला मारहाण केली होती. त्यामुळे ती खाली पडली. याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर : हे खरे नाही.

प्रश्न क्रमांक १६ : तिच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, त्यानंतर तुम्ही तिला पुन्हा खांद्याला, पाठीला व हाताला मारहाण केली होती. याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर : हे खरे नाही.

प्रश्न क्रमांक १७ : तिच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, त्यानंतर ती व तिचे पती घरी आले आणि त्यानंतर तिचे पतीने सेवाग्राम पोलिस स्टेशनला जावून नि.क्र. २५ व २६ वरील तक्रार तुमचेविरूध्द दाखल केली होती. याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर : हे खरे नाही.

आरोपीची सही/अंगठा

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग

प्रश्न क्रमांक १८ : तिच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, पोलिसांनी त्यांना सरकारी दवाखाना, वर्धा येथे पाठविले होते व तेथे त्यांचेवर उपचार झाले होते. याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर : हे खरे नाही.

प्रश्न क्रमांक १९ : तिच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, ज्या काठीने तिला व तिचे पतीला मारहाण केली होती ती दाखविल्यास ती ओळखू शकते. याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर : हे खरे नाही.

प्रश्न क्रमांक २० : अभियोगपक्षाचे साक्षीदार तुमच्याविरूध्द साक्ष का देत आहे याचे तुम्हाला कारण सांगता येईल काय ?

उत्तर : नाही.

प्रश्न क्रमांक २१ : तुम्हाला शपथेवर साक्ष द्यायची आहे काय ?

उत्तर : नाही.

प्रश्न क्रमांक २२ : तुम्हाला बचावाचे साक्षीदार तपासायचे आहे का? असल्यास कोणते?

उत्तर : नाही.

प्रश्न क्रमांक २३ : तुम्हाला खटल्याबद्दल काही सांगायचे आहे काय ?

उत्तर : नाही.

आरोपीची सही

...........................

माझे समक्ष

Digitally signed by VICKRANT PRALHAD KHANDARE
Date: 2026.07.15 17:15:17 +0530

(वि. प्र. खंदारे)

दिनांक : १५/०७/२०२६

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, वर्धा.
(फौजदारी न्यायालय क्र. १)

**<u>प्रमाणपत्र</u>**

प्रमाणित करण्यात येते की, आरोपीची जबानी माझेसमक्ष त्याचे सांगण्याप्रमाणे त्याचे शब्दात त्याचे विद्वान वकिलांचे उपस्थितीत नोंदविण्यात आली.

माझे समक्ष

(वि. प्र. खंदारे )

दिनांक : १५/०७/२०२६

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, वर्धा.
(फौजदारी न्यायालय क्र. १)